# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०१/०८/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका येथे दिनांक ०१/०८/२०२४ रोजी सकाळी १२:०० वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतीथी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मा. अतिरिक्त आयुक्त, श्री. जमिर लेंगरेकर, श्री. सुभाष जाधव, मा. उपायुक्त, श्रीमती छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, श्री. अंकुश कदम, भांडार विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांनी पुष्पहार व फुले वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी काही विद्यार्थ्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनगाथेवर भाषण करण्यात आले. तसेच मा. अतिरिक्त आयुक्त यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना एक उदभोदनाचा कार्यक्रम राष्ट्रपुरूषांच्या समाजसेवेची ओळख तसेच विविध स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या मनामध्ये थोर राष्ट्रपुरूषांचे कार्य मनामध्ये रुजवावे हा एकमेव हेतु होता.

यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपले मनोगत देखील व्यक्त केले. तसेच जनसंपर्क अधिकारी, श्रीमती छाया डांगळे यांनी मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करवी.